# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक - ३१३ दिनांक ०९/११/२०२१

## मंदिरात चोरी करणाऱ्यास अटक करुण मुदेदमाल हस्तगत - नवघर पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटिकरण कक्षाची कामगिरी

दि.०७/११/२०२१ रोजी नवघर पोलीस ठाणे हददीत न्यु गोल्डन नेस्ट, डिव्हाईन चर्च समोर फाटक रोड, भाईंदर पुर्व, येथील संकट मोचन हनुमान मंदिराचे स्टिलच्या दरवाजाचे लॉक व लोखंडी साखळी तोडुन मंदिरामधील हनुमान भगवानची ०१ फुटी उंचीची पितळी मुर्ती व स्टिलची लोखंडी दानपेटी अशा वस्तु चोरी केलेबाबत फिर्यादी नामे धीरज राजमणी मिश्रा यांनी दिलेल्या फिर्यादी वरुन नवघर पोलीस ठाणे गु. रजि. न. ७६४/ २०२१ भा.द.वि.सं. कलम ३८०, ४५७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

नमुद गुन्हा उघडकीस आणण्याकरीता वरिष्ठांच्या सुचनेप्रमाणे नवघर पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटिकरण कक्षातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास व गुप्त बातमीरांमार्फत माहिती काढुन संशयित इसम नामे राजु बंगाली, वय ३१ वर्षे, रा. भाईंदर परिसरात फिरस्ता, मुळ रा. पश्चिम बंगाल यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्याने गुन्हा केल्याचे कबुल केल्याने त्यास सदर गुन्हयात अटक करण्यात आली. तपासादरम्यान गुन्हयातील मुदेदमालाबाबत आरोपीतास विचारणा केली असता मंदिरातील चोरी केलेली हनुमान भगवानची पितळी मुर्ती व स्टिलची लोखंडी दानपेटी ही इसम नामे पंकज गौतमलाल सेवक वय २७ वर्षे, रा. शांती स्वरुप बिल्डींग, रेशन कार्ड ऑफिस जवळ, मिरारोड पुर्व, ठाणे यास विक्री केल्याचे सांगितल्याने सइर व्यक्तीस देखील अटक करुन त्याच्याकडुन चोरीस गेलेली भगवानची पितळी मुर्ती व स्टिलची लोखंडी दानपेटी हस्तगत करण्यात आली आहे. नमुद गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन गुन्हा अवघ्या ०८ तासांत उघड करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री. अमित काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०१, श्री. शशीकांत भोसले, सहा. पोलीस आयुक्त, नवघर विभाग, यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. मिलिंद देसाई, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, श्री. प्रकाश मासाळ, पोलीस निरीक्षक (गुन्हे), गुन्हे प्रकटिकरण कक्षाचे पो.उप.निरी. श्री. संदिप ओहोळ, पो.ना. राहुल लोंढे, पो.शि. गणेश जावळे, सुरज गुणावत, संदिप जाधव यांनी केली आहे.

------ooo------